नियमित दिवाणी दावा क्र.१७०/२०२०
पोटे वि. घोळवे

## निशाणी क्र.०५ खाली आदेश

**वाद मिळकत** – मौजे शेलगाव–वांगी ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन मिळकत गट क्र.१९९/१/अ आणि गट क्र.१९९/१/ब/१, क्षेत्रफळ अनुक्रमे ० हे.८३ आर. आणि ० हे.४७ आर हा या दाव्याचा वाद विषय आहे.

२. **वादी यांचे कथन व युक्तीवाद** –

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहित आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाखल केलेला आहे. वादी आणि प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंब आहे. फेरफार क्र.२६६० नुसार जरी वाटप दर्शवून ७/१२ पत्रकी प्रतिवादी यांचे नांवे दर्शविली असली तरी त्यांच्या नांवाची नोंद समाईकात आहे. वाद मिळकतीचे अदयाप वाटप झालेले नाही. गट क्र.१९९ यांचे जरी वाटप झाले असले तरी तसा मोजणी नकाशा अदयाप तयार झालेला नाही. वाद मिळकती दोन्ही पक्षांच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत. वादी व प्रतिवादी हे वर्ग १ वारस आहेत. सबब, हिंदु वारसा अधिनियम कलम २२ प्रमाणे वादी यांना प्रतिवादी यांची मिळकत अग्रहक्काने खरेदी करण्याचा हक्क आहे. प्रतिवादी यांनी वाद मिळकत त्रयस्थ इसमांना विकण्याबाबत बोलणी केली आहे. तसेच इसारा रक्कम स्वीकारली आहे. प्रतिवादी वादी यांना वाद मिळकत विक्री करू ईच्छीत नाहीत. सबब, प्रतिवादी यांनी वाद मिळकत त्रयस्थ

इसमांना विक्री केल्यास वादी यांचे पैशाने कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. या कारणास्तव वादी यांना प्रथमदर्शनी प्रकरण आहे. सुविधेचा समतोल वादी यांच्या बाजूने आहे. सबब, प्रतिवादीविरूध्द वाद मिळकत त्रयस्थ इसमांना विक्री करू नये म्हणून दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश पारीत करावा अशी विनंती केली आहे.

**प्रतिवादी क्र.१ व २ यांचे कथन व युक्तीवाद** –

**३**. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी १२ कडे कैफीयत व प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी दाव्यातील सर्व कथने अमान्य केली आहेत. त्यानुसार वाद मिळकतीचे वाटप फेरफार क्रमांक २६६० ने दिनांक २/१/१९९६ रोजी झाले आहे. त्या वाटपात वादी यांचे वडील रवींद्र यांना स्वतंत्र हिस्सा मिळाला होता. वादी, प्रतिवादी आणि इतर वारस हे वाटपात नमूद केल्याप्रमाणे वाद मिळकतीच्या स्वतंत्र वहिवाटीत आहेत. प्रतिवादी क्र.२ बहिणाबाई या वादी यांच्या चुलत आजी आहेत. या कारणास्तव वादी आणि प्रतिवादी हे एकमेकाचे वर्ग १ वारस नाहीत. या कारणास्तव वादी यांना वाद मिळकतीबाबत अग्रहक्काने खरेदी घेण्याचा कोणताही अधिकार नाही. तसेच प्रतिवादी यांचा वाद मिळकत विक्री करण्याचा कोणताही उद्देश नाही. वादी यांना प्रथमदर्शनी प्रकरण नाही. सबब, प्रस्तुत अर्ज खर्चासह रद्द करावा अशी विनंती त्यांनी केली.

**४**. दोन्ही पक्षांच्या म्हणण्याचे अवलोकन केले. यावरुन खालील मुद्दे

निश्चीत करण्यात येत आहे. त्याचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांनी प्रथमदर्शनी प्रकरण सिध्द केले आहे काय ? | नाही |
| २. | सुविधेचा समतोल वादी याच्या बाजूने आहे काय ? | नाही |
| ३. | आदेश वादी यांच्या पक्षात पारीत न झाल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | नाही |
| ४. | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

**:<u>कारणमिमांसा</u>:**

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता –**

**५**. मुद्दा क्र.१ ते ३ एकमेकांस संलग्न आहेत. सबब, त्यांचे एकत्रात विवेचन करण्यात येत आहे. वादी यांनी हिंदु वारसा अधिनियम कलम २२ प्रमाणे वाद मिळकत अग्रहक्काने खरेदी घेण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. कलम २२ प्रमाणे अग्रहक्काचा अधिकार प्राप्त होण्यासाठी खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

अ. वादी आणि प्रतिवादी हे एकमेकाचे वर्ग १ चे वारस असणे आवश्यक आहे.

ब. ज्या मिळकतीविषयी अग्रहक्काने खरेदीची मागणी करण्यात आली आहे ती मिळकत वारसांना वर्ग १ म्हणून त्यांच्या पूर्वजांच्याकडून त्यांच्या मृत्युपूर्वी

मिळकतीची कोणतीही विल्हेवाट लावण्यासंदर्भात व्यवस्था न केल्यामुळे मिळणे आवश्यक आहे.

क. प्रस्तुत मिळकत विक्री करण्याचा उद्देश असणे आवश्यक आहे.

६. प्रथमदर्शनी प्रकरणासाठी वादी वर नमूद बाबींचे पूर्तता करण्यास पात्र आहेत किंवा नाहीत याचे विवेचन करणे आवश्यक आहे. सबब, दोन्ही पक्षांचे कथन आणि कागदपत्र यांचे अवलोकन केले. वादी यांच्या दाव्यात नमूद केल्याप्रमाणे वाद मिळकतीचे वाटप फेरफार क्रमांक २६६० ने झाले असलेतरी ते महसूल अधिकारी यांच्याशी संगनमत करून तयार करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे कोणतेही वाटप झालेले नाही. वादी यांनी निशाणी ४ सोबत फेरफार क्र.२६६० चा उतारा दाखल केलेला आहे. सदर उता–याचे अवलोकन केले. सदर उता–यात **दिनांक १७/१२/१९९५ रोजी बाजूस दाखल केलेल्या जमीनीचे खातेदार श्री नामदेव कृष्णा पोटे यांनी आपल्या नांवावर असणा–या गट क्र.१७१ व १९९ या जमीनीचे आपल्या मुलांना व भावाला खालील जमीनी वाटप करून दिलेले आहे. त्या जमीनी प्रत्यक्ष कब्जा व वहिवाटीत आहे. तरी त्या कब्जे व वहिवाटीची आलेली नोंद करण्याबाबत अर्ज दिल्यावरून** असा मजकूर नमूद आहे. तसेच सदर नोंद कायम झाल्याबाबत शेराही त्यात नमूद आहे. सदरची नोंद दिनांक ०२/०१/१९९६ रोजी मंजूर करण्यात आली आहे. त्याबाबत वादी यांनी त्यात कुठेही तक्रार दाखल केलेली नाही. यावरून प्रथमदर्शनी वाद मिळकतीचे वाटप

१९९६ साली झाल्याचे स्पष्ट होते.

७. वादी यांनी कागदपत्रांच्या यादीसोबत दिनांक २४/०८/२०२० रोजी पोलीस निरीक्षक, करमाळा यांना पाठविलेले पत्र दाखल केलेले आहे. सदर पत्रात **२५ वर्षापूर्वी आमचे जमीनीचे वाटप झाले असून सदरील वाटप शासकीय मोजणीदार न होता अंदाजे झालेले आहे** असा मजकूर आहे. सदर अर्जात वादी यांनी वाद मिळकती एकत्र कुटुंबात आहेत किंवा सदरचे वाटप महसूल अधिकारी यांच्याशी हातमिळवणी करून केलेले आहे या बाबी नमूद नाहीत. सदर अर्जातील कथने आणि दाव्यातील कथने परस्परविरोधी आहेत. या कारणास्तव वादी आणि प्रतिवादी यांच्यात वाटप झाले नसून त्यांचे अदयापही एकत्र कुटुंब आहे ही बाब वादी प्रथमदर्शनी सिध्द करू शकले नाहीत.

८. फेरफार क्रमांक २६६० चे अवलोकन करता वाद मिळकत प्रतिवादी यांना वाटपात मिळालेली आहे. सदर मिळकत प्रतिवादी यांना भानुदास हे वाद मिळकतीची कोणतीही तजवीज न करता व प्रतिवादी हे त्यांचे वारस असलेने मिळाली आहे असे वादी यांचे कथन नाही. हया कारणास्तव कलम २२ मधील आवश्यक बाबींची पूर्तता प्रथमदर्शनी या प्रकरणात होत नाहीत.

९. प्रतिवादी क्र.२ वादी यांची चुलत आजी आहे. प्रतिवादी क्र.२ यांचे पती भानुदास हे वादी यांचे चुलत आजोबा आहेत. सबब, वादी आणि प्रतिवादी हे वर्ग १ वारस नाहीत. या कारणास्तव प्रथमदर्शनी कलम २२ मधील आवश्यक बाबींची पूर्तता

करण्यास वादी असफल ठरले आहेत.

**१०.** प्रतिवादी यांची कैफियत याचे अवलोकन करता वाद मिळकत विक्री करण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नाही ही बाब स्पष्ट होते. तसेच वादी यांनी कथन केल्याप्रमाणे प्रतिवादी यांनी त्रयस्थ इसमांकडून विसाराची रक्कम स्वीकारली आहे असे कथन केले आहे. मात्र या संदर्भात कोणताही कागदोपत्री पुरावा व करारपत्र वादी यांनी दाखल केले नाहीत. सबब, प्रथमदर्शनी प्रतिवादी हे वाद मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत किंवा त्यांचा विक्री करण्याचा उद्देश आहे ही बाब वाद सिध्द करण्यास असफल ठरले आहेत.

**११.** वरील विवेचनाप्रमाणे प्रथमदर्शनी हिंदु वारसा अधिनियम कलम २२ मधील आवश्यक बाबींची पूर्तता वादी प्रथमदर्शनी करू शकले नाहीत. वादी यांना प्रथमदर्शनी प्रकरण नाही. या कारणास्तव सुविधेचा समतोल आणि अपरिमित नुकसान या बाबी वादी यांच्या पक्षात नाहीत. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देऊन मुद्दा क्र.४ करिता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च अंतिम निकालात समाविष्ठ करण्यात यावा.

करमाळा (संग्राम सु.जाधव)

दिनांक –०८.१०.२०२० सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, करमाळा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | Labade N.B., Steno. Grade-3 |
| b) | Court | : | Shri. Sangram S. Jadhav,<br>Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C.,<br>Karmala, Dist. Solapur. |
| c) | Date of Judgment/Order | : | 08.10.2020 |
| d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 08.10.2020 |
| e) | Judgment/Order uploaded on | : | 08.10.2020 |